# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ३ रे अंक २८७ वा बुधवार दि.२४ एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# ग्रामीण जनतेच्या हिताचे निर्णय घेऊन भाजपा सरकारने प्रत्यक्ष अंमलबजावणी केली : ऋषिकेश कराड





रेणापूर/प्रतिनिधी : सर्वाधिक काळ सत्ता उपभोगणार्या काँग्रेसने निवडणुकीत दिलेली आश्वासने कधीच पूर्ण केली नाहीत मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील भाजपा सरकारने देशातील शहरांसह ग्रामीण भागातील जनतेला दिलासा देणारे निर्णय घेऊन त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली असल्याचे प्रतिपादन भाजयुमोचे प्रदेश सचिव ऋषिकेश कराड यांनी केले.

रेणापूर तालुक्यातील मौजे हरवाडी येथे भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ बैठकांचे आयोजन करण्यातआले होते. यावेळी कराड बोलत होते. याप्रसंगी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, विस्तारक दिलीप पाटील, उपसरपंच चंद्रकांत माने यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. कराड म्हणाले की, लोकसभेची निवडणूक देशाच्या प्रश्नांबरोबरच ग्रामीण भागातील विकास कामांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. केंद्र शासनाच्या माध्यमातून ग्रामीण भागात नरेंद्र मोदी यांनी गोरगरीब सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानत अनेक योजना सुरू केल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि खा. सुधाकर शृंगारे यांच्यावर भ्रष्टाचाराचा कसलाही आरोप नाही. अशा निस्वार्थ आणि जनहिताचा विचार करणार्या नेतृत्वाच्या पाठीशी आपण सर्वांनी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. त्यांनी केलेल्या कामाला साथ देण्यासाठी आणि येणार्या काळात आपल्या भागातील विकास कामाला गती देण्यासाठी येत्या ७ मे रोजी कमळाच्या चिन्हा समोरील बटन दाबून भाजपा महायुतीला प्रचंड बहुमताने विजयी करावे, असे आवाहनही कराड यांनी केले.

याप्रसंगी महेंद्र गोडभरले आणि दशरथ सरवदे यांनी आ. रमेशअप्पा कराड यांच्या माध्यमातून हरवाडी गावात आणि रेणापूर तालुक्यात झालेल्या विविध विकास कामांची माहिती दिली. यावेळी नानासाहेब माने, अशोक गंगथडे, मारुती हाके, अशोक पोळ, यशवंत इंगळे, विशंभर माने, तुकाराम चोथवे, शेषराव माने यांच्यासह ग्रामस्थ व महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंतप्रधान मोदींचे काम देशात आर्थिक क्रांती घडविणारे आ. संभाजी पाटील निलंगेकर





निलंगा/प्रतिनिधी : मागील दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने जी धोरणे आखली. त्यामुळे देशात आर्थिक क्रांती घडत आहे. देशांतर्गत विकासाला चालना मिळतानाच आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय अर्थव्यवस्था वेगाने घौडदौड करीत आहे, असे प्रतिपादन लातूर लोकसभा संयोजक माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले. लातूर लोकसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रचारार्थ देवणी तालुक्यातील धनेगांव येथे प्रचार सभा संपन्न झाली. यावेळी उपस्थित नागरिक बंधू-भगिनींशी आ.संभाजी पाटील निंलगेकर यांनी संवाद साधला. यावेळी तालुकाध्यक्ष काशिनाथ गरिबे, निलंगा विधानसभा प्रमूख दगडू सोळुंखे, माजी जि.प.सदस्य प्रंशात पाटील, संजय दोरवे, शेषेराव ममाळे, सरपंच सौ. मिनाताई परीट, उपसंरपच रामलिंग शेरे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना आ. निलंगेकर म्हणाले की, ही निवडणूक देशहिताची व स्वाभिमानाची आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात सरकारने देशाचे नाव मोठे करण्याचे काम केले. आज जगात देशाचे नाव सर्वात प्रगतशील देश म्हणून घेतले जाते. राष्ट्रहिताबरोबरच जनतेला आत्मनिर्भर करण्याचे काम मोदी सरकारने केले आहे. मोदीजींनी केलेल्या कामाचा सर्व लेखाजोखा मतदारांपुढे आहे. गेल्या ६५ वर्षाच्या काँग्रेसच्या काळापेक्षा अधिक गतीने विकास कामे भाजपाच्या सरकारने केली आहेत. मोदी सरकारने महिला व शेतकर्यांना समृध्द करण्याचा संकल्प केला आहे. धोरणात्मक बदल करुन अर्थिक क्रांती घडवून आणण्यासाठी मोदी सरकार काम करत आहे. महिला सुरक्षा व संविधान जोपासण्याचे काम मोदीजींच्या नेतृत्वात होत असल्याची भावना यावेळी आ. निलंगेकर यांनी व्यक्त केली.

यावेळी माजी संरपच रविंद्रकुमार पाटील, हिसामनगरचे संरपच विजयकुमार मुक्के, सुखानंद काळशेट्टे, सौ. रंजनाताई पोलकर, बाळासाहेब बिरादार, नरसिंग बिरादार, चेअरमन संगाप्पा चरपले, लक्ष्मण पवार, विठ्ठल बोयणे, जंयत पाटील, अमर बिरादार, अमित बिरादार, माधव बिरादार, शेट्टीबा पवार, दीपक पवार, अनिल राठोड, सुरेश पवार, लक्ष्मण पवार, परमेश्वर माने, हणमंत बिरादार आदीसह भाजपा महायुतीचे कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे लातूर जिल्हा सरचिटणीस तथा **दैनिक महावृत्तचे संपादक (पत्रकार)** सन्माननीय



**अशोक जी हनवते साहेब** यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक-





शुभेच्छूक
**सागर रामभाऊ तायडे**
भांडुप मुंबई




## फेरीवाल्यांना संरक्षण देणाऱ्या दुकान मालकासह खाजगी इमारतीच्या अध्यक्ष व सेक्रेटरी आता होणार महानगरपालिका तर्फे कारवाई.

मुंबई/ शहामत शेख. न्यायालयाच्या निर्देशानुसार बांद्रा पाली हिल येथे फेरीवाल्या विरोधात धडक कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली आहे. आता फेरीवाल्यांना आडोसा व संरक्षण देणाऱ्या दुकान मालकासह गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष व सेक्रेटरी यावर पालिका कारवाईचा बडगा उभारणार आहे,असे महानगरपालिकेने स्पष्ट केले. अनाधिकृत फेरीवाल्यांना कोणत्याही प्रकारची पूर्वकल्पना किंवा नोटीस देण्याची गरज नाही,फेरीवाल्यांना सार्वजनिक जागेवर विनापरवाना व्यवसाय करण्यास हक्क नाही असा महत्वपूर्ण निर्णय देत वांद्रे हिल रोडवरील अनधिकृत फेरीवाल्यांना झटका दिला.उच्च न्यायालयाने फेरीवाल्या विरोधात कारवाईची धडक मोहीम राबवा असे निर्देश पालिकेला दिले, बांद्रा पाली हिल रोडवरील उच्चभ्र परिसरातील दोन रहिवासीने दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती गौतम पटेल व न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठापुढे झालेल्या सुनावणीत निर्णय दिले होते. त्यानुसार पाली हिल फेरीवाल्या विरोधात कारवाईचा बडगा उभारण्यात आला आहे. एच पश्चिम पालिका अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार या भागात फेरीवाल्याविरोधात सातत्याने कारवाई करण्यात येते,परंतु कारवाई केल्यानंतर पाठ फिरवताच पुन्हा फेरीवाले तिथे येतात. ज्या खाजगी इमारती बाहेरील बाजूस बस्तान मांडतात ,या खाजगी इमारतीमध्ये मोकळ्या जागेत कारवाई दरम्यान आपले सामान्य नेऊन ठेवतात. त्यामुळे फेरीवाल्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण देऊ नये म्हणून, एका वर्षापूर्वी खाजगी इमारतीच्या सचिव अध्यक्ष यांच्या नावाने नोटीस जारी करण्यात आल्या होत्या. अशा प्रकारच्या सूचना देऊनही फेरीवाल्यांना संरक्षण देऊ नये यावर पालिकेतर्फे कारवाई करण्यात येईल असा इशारा देण्यात आला होता. सूचना करूनही काही दुकानदार व गृहनिर्माण संस्था द्वारे संरक्षण दिले जात असल्याचे प्रकार समोर आले. दुकानदार व खाजगी इमारतीच्या आवारात यांचे सामान आढळल्यास तीव्र कारवाई करण्यात येईल,असे अधिकाऱ्याने स्पष्ट केले.

## संपादकीय....

# मालदीवचे मळभ

मालदीवशी संबंध ताणले असले तरी ते पूर्ववत होण्यासाठी भारताला राजनैतिक कौशल्य पणाला लावावे लागेल.जागतिक राजकारणाचा केंद्रबिंदू आखातातून आता हिंद-प्रशांत महासागराकडे सरकत आहे. विशेषतः चीनने आक्रमक रणनीती आखत लष्करी आणि विशेषतः सागरी सामर्थ्य वाढवण्यावर भर दिला आहे. दक्षिण-चीन समुद्रात बस्तान बसवले आहे. त्या पार्श्वभूमीवर मालदीवसारख्या सामरिकदृष्ट्या मोक्याच्या देशाचे महत्त्वही तितकेच आहे.

गेल्या वर्षाखेरीस मालदीवच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत 'इंडिया आउट'चा नारा देत, सार्वभौमत्वाशी कोणतीही तडजोड न करण्याचा धोशा लावत 'पीपल्स नॅशनल काँग्रेस'चे (पीएनसी) मोहम्मद मोईझ्झू अध्यक्षपदी निवडून आले. त्यावेळेपासून भारत आणि मालदीव यांच्या संबंधांत तणाव निर्माण झालेला आहे. तथापि, मालदीवच्या संसदेत, म्हणजेच 'मजलीस'मध्ये बहुमताअभावी त्यांचे हात बांधले होते.आश्वासने पूर्ण करायला आडकाठी होत होती. पण 'मजलीस'च्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत मोईझ्झू यांच्या 'पीएनसी'ने जाहीर ८६पैकी ६६ जागा जिंकून सभागृहात आपले वर्चस्व निर्माण केले आहे. त्यांच्याविरोधी, भारतधार्जिण्या 'मालदीवन डेमोक्रॅटिक पक्षा'ला (एमडीपी) केवळ दहा जागांवर समाधान मानावे लागले.मोईझ्झू यांनी पक्षांतरविरोधी कायदाही संमत करून घेतला आहे. भारताच्या दृष्टीने मालदीवमधील या घडामोडी महत्त्वाच्या आणि उभयतांच्या संबंधांवर दीर्घकालीन परिणाम करणाऱ्या आहेत.विशेषतः 'बेल्ट अँड रोड' उपक्रमांतर्गत चीनने भारताभोवतीच्या पाकिस्तान, श्रीलंका, म्यानमार, नेपाळ, बांगलादेश या शेजारील देशांत चंचूप्रवेश केला आहे. मालदीवही त्याला अपवाद नाही. त्यातच मोईझ्झूसारख्या राज्यकर्त्यांचा भारतद्वेष आणि चीनच्या कच्छपी लागण्याची रणनीती हेच त्यांच्या स्थानिक राजकारणाचे बलस्थान आहे. त्यामुळे अध्यक्षपद स्वीकारल्यावर त्यांनी परंपरेनुसार भारताला भेट देणे अपेक्षित असताना चीनचा रस्ता धरला.चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी गळाभेट घेत आपले चीनप्रेम व्यक्त केले. मुइझ्झू यांनी सत्तेवर आल्यावर भारतविरोधी निर्णयांचा सपाटा लावला. विशेषतः व्यूहरचनात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या तसेच मालदीवला आपत्तीकाळात मदत म्हणून भारताने दोन हेलिकॉप्टर आणि विमान तैनात केले आहे. त्यासाठी नेमलेले लष्करी कर्मचारी काढून तेथे नागरी कर्मचाऱ्यांना नेमण्यासाठी येत्या दहा मेपर्यंत मुदत दिली आहे.एवढेच नव्हे तर उभय देशातील नाविक सहकार्य कराराला मुदतवाढ नाकारली, त्याऐवजी चीनच्या टेहळणी बोटींना मात्र परवानगी दिली. भारतविरोधाने पछाडलेल्या मोईझ्झू यांच्या पक्षाला 'मजलिस'मध्ये मिळालेले बहुमत त्यामुळेच उभय देशांच्या संबंधातील तणाव वाढवणारे ठरू शकते. मोईझ्झू यांनी आधीचे अध्यक्ष इब्राहिम सोलिह यांच्या 'एमडीपी'ने भारतासमोर सार्वभौमत्व गहाण टाकल्याचा आरोप करत सत्ता पटकावली.चीनसाठी लाल गालिचे पसरणाऱ्या देशांना चीनच नंतर देशोधडीला लावतो असा आतापर्यंतचा अनुभव आहे. त्यातून धडा घेण्याची सध्या तरी मोईझ्झू यांची मानसिकता दिसत नाही. त्यामुळेच पायाभूत प्रकल्पांच्या फेरविचाराची घोषणा करत भारतीय गुंतवणुकीच्या प्रकल्पांनाही त्यांनी लक्ष्य केले आहे. भारताने सात अब्ज रुपये तिथे गुंतवले आहेत.कोणत्याही देशाची निवडणूक होते तेव्हा मतदारांना आश्वासने द्यावी लागतात, त्यांच्या इच्छा-आकांक्षांचे प्रतिबिंब त्यात असते. त्यानुसार मोईझ्झूंनी भारतविरोधाची धार तेज केली आहे. तथापि, सगळ्यात मोठी चिंतेची बाब आहे ती मालदीवची मुस्लिम मूलतत्त्ववादाच्या दिशेने होणारी वाटचाल. मोईझ्झू यांच्याच पक्षाची २०१३-२०१८ दरम्यान सत्ता होती, तेव्हा अब्दुल यमीन अध्यक्ष होते. त्यांच्याच काळात सीरियामध्ये इस्लामिक स्टेटसाठी (इसीस) लढण्याकरता मालदीवचे दोनशेवर नागरिक गेले होते. पाच लाख लोकसंख्येमध्ये ही संख्या लक्षणीयच आहे. दहशतवाद आणि असहिष्णुतेची मालदीवमध्ये पाळेमुळे घट्ट करण्याचे प्रयत्न भारतासाठी सर्वाधिक चिंतेची बाब आहे. मोईझ्झू सार्वभौमत्व, राष्ट्रवादाचा राग आळवून तेथील जनतेला भरकटवत आहेत.जानेवारीत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लक्षद्वीप हा पर्यटनासाठी चांगला पर्याय, असे विधान केले, तेव्हा तेथील मंत्र्यांसह राज्यकर्त्यांनी गरळ ओकण्यामागची मळमळ यातून लक्षात येते. अर्थात, भारतीय पर्यटकांनी पाठ फिरवल्याने मालदीवला आर्थिक झळ बसलीच. निवडणुकांच्या राजकारणात, प्रचारात परराष्ट्रधोरणापेक्षा अनेकदा स्थानिक मुद्दे प्रभावी ठरतात.मालदीवमधील राजकीय स्थैर्य, धोरण निश्चिती, त्यातील सातत्य, त्याची कार्यवाही हे त्यांच्यासमोरील प्रश्न आहेत. त्यामुळेच चीनधार्जिण्या धोरणाला पाठिंबा मिळत आहे; म्हणजे भारताला संधीच नाही, असे म्हणणे गैर ठरेल. जीवनावश्यक वस्तूंपासून आपत्ती काळातील मदतीपर्यंत मालदीवला भारताशिवाय पर्याय नाही, हेही वास्तव आहे. अलीकडेच आपण निर्यातबंदी असतानाही अपवाद करून मालदीवला साखर, कांदा यांची निर्यात केली. मोईझ्झूही भारताशी सौहार्दाची अपेक्षा करत आहेत. त्यामुळेच त्यांची देशांतर्गत अपरिहार्यता लक्षात घेऊन आपण राजनैतिक पातळीवर उभय देशांतील संबंधातील गैरसमज दूर करण्यावर भर द्यावा.मात्र, सहकार्याचा पूल बळकट करतानाच चीनचा मागल्या दाराने होणाऱ्या प्रवेशाला रोखण्यासाठी कौशल्यही पणाला लावावे.

# लोकसभा निवडणूक निकालाचे अचूक भविष्य वर्तवा आणि एकवीस लाख रूपये जिंका !

सध्या देशभरात लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी चालू आहे. महाराष्ट्रात आणि देशात होणाऱ्या विविध स्तरांवरील निवडणूक निकालांचे भाकीत प्रत्येक निवडणुकीवेळी ज्योतिषी वर्तवत असतात. अनेक राजकीय नेते देखील ह्या फसवणुकीला बळी पडतात, त्यामुळे अज्ञानी आणि भाबडया लोकांच्यात गैरसमज पसरतात आणि अंधश्रध्दा निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीने देशातील सर्वच ज्योतिषांना निवडणूक निकालाचे अचूक भविष्य वर्तवून एकवीस लाख रुपये बक्षीस जिंकण्याचे आव्हान दिले आहे अशी माहिती डॉ. हमीद दाभोलकर, राहुल थोरात, सम्राट हटकर, रामभाऊ डोंगरे, मिलिंद देशमुख, प्रकाश घादगिने, विनोद वायगणकर, प्रवीण देशमुख यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या द्वारे दिली आहे. त्यासाठीची आव्हान प्रक्रिया व प्रश्नावली देखील महाराष्ट्र अंनिसने जाहीर केली आहे. हे आव्हान राजकीय अंदाज वर्तवणाऱ्या राजकीय अभ्यासकांना नाही तर ज्योतिष्यशास्त्राचा आधार घेऊन राजकीय भविष्य सांगणाऱ्या ज्योतिषांना आहे.

काय आहे आव्हान प्रश्नावली :

सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठीही अंनिसमार्फत ही आव्हान प्रक्रिया लोकप्रबोधनाचा हेतू नजरेसमोर ठेवून राबवली जात आहे. जे ज्योतिषी या आव्हान प्रक्रियेत सहभागी होतील, त्यांना समितीमार्फत एक प्रश्नावली दिली जाईल. या प्रश्नावलीमध्ये अंनिसने ज्योतिषांना काही प्रश्न विचारले आहेत. त्यामध्ये लोकसभा निवडणुकीमध्ये टी.शैलजा, नितीन गडकरी, राहुल गांधी, महुआ मलहोत्रा, कंगना राणावत यांना किती मते पडतील ? तसेच कलकत्ता उत्तर, नालंदा, रायपूर, बारामती, आग्रा, बेल्लारी या मतदार संघातून कोण विजयी होईल ? वाराणसी, बुलढाणा, चांदणी चौक, लडाख, वेल्लोर, भुवनेश्वर या मतदारसंघात सगळ्यात कमी मते कोणाला पडतील ? संपूर्ण भारतात सर्वांत कमी मते कोणत्या उमेदवाराला पडतील ? कोणत्या मतदारसंघात नोटाला जास्त मतदान होईल ? पाच हजारांपेक्षा कमी मताधिक्य किती उमेदवारांना मिळेल ? या प्रश्नांची अचूक उत्तरे ज्योतिषांनी देणे अपेक्षित आहे.

भविष्य कसे वर्तवले ते सांगा :

राजकीय भविष्य सांगण्यासाठी कोणती ज्योतिष पद्धत वापरली यांची माहिती ज्योतिषांनी देणे अत्यावश्यक आहे. उदा. उमेदवाराची जन्म कुंडली, हस्तरेषा शास्त्र, अंकशास्त्र, टॅरो कार्ड, राशीभविष्य, नाडी भविष्य, होरा शास्त्र, कृष्णमूर्ती पद्धत, प्राणी पक्षी यांचा वापर करून वर्तवलेले भविष्य किंवा अर्ज भरताना काढलेला मुहूर्त, प्रचाराचा काढलेला शुभ मुहूर्त, उमेदवाराच्या नावातील अद्याक्षरे.

प्रश्नावली आणि गुण पध्दत :

या प्रश्नावलीत एकूण चार प्रमुख प्रश्न असून प्रत्येक प्रश्नांच्या अंतर्गत काही उपप्रश्न आहेत. प्रत्येक योग्य उत्तरला पाच गुण देण्यात येतील. एकूण शंभर गुण अशी या प्रश्नावलीची रचना आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देताना ते उत्तर ज्योतिषाची कोणती पद्धत आणि कशी वापरून काढले याची सविस्तर माहिती देणे अत्यावश्यक आहे. या माहितीसाठी अर्धे गुण असतील आणि अर्धे गुण उत्तरासाठी असतील.

आव्हान प्रक्रिया काय आहे ?

या आव्हान प्रक्रियेमध्ये सहभाग घेण्यासाठी प्रवेशिका, उत्तरासहित अधिकृत प्रश्नावली आणि 'अंधश्रध्दा निर्मूलन समिती, महाराष्ट्र' या नावे काढलेला रूपये ५००० (रूपये पाच हजार) प्रवेश शुल्काचा धनाकर्ष (डी.डी.) सीलबंद पाकीटातून दि. २५ मे २०२४ पर्यंत रजिस्टर पोस्टाने कार्तिक अपार्टमेंट, एफ-४, सहारा चौक, संजयनगर, सांगली - ४१६४१६. फोन नंबर - ०२३३-२३१२५१२ पत्त्यावर मिळणे बंधनकारक आहे. निवडणूक आयोगाने अधिकृतपणे सर्व निकाल त्यांच्या संकेतस्थळावर जाहीर केल्यानंतर दोन आठवडयाच्या आत परीक्षक समितीच्यावतीने योग्य तो अधिकृत निकाल जाहीर करण्यात येईल.

ज्योतिषांना ग्राहक संरक्षण कायदा लागू करा!

या पार्श्वभूमीवर फलज्योतिषाचा व्यवसाय करणाऱ्या ज्योतिषांना ग्राहक संरक्षण कायदा लागू करा, अशी मागणी महाराष्ट्र अंनिसतर्फे करण्यात आली आहे. त्यामुळे वर्तविलेले भविष्य खरे ठरले नाही, तर नुकसान भरपाई मिळण्याची संधी ग्राहकाला उपलब्ध राहील. अशा पार्श्वभूमीवर महाराष्ट्र अंनिसने दिलेले आव्हान ज्योतिषांनी वर्तविलेल्या भविष्याचा खरेपणा सिद्ध करण्याची संधी मानून स्वीकारावे, असे जाहीर आवाहन प्रकाश घादगिने राज्य का. का.समिति सदस्य .मुकुंदराव गोडबोले अध्यक्ष पंकज जैस्वाल कार्याध्यक्ष,एम बी.पठाण प्रधान सचिव अड दाभाडकर राजकुमार यांनी या प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेले आहे.

ज्योतिषाबद्दल अंनिसची भूमिका :

'फलज्योतिष हे शास्त्र नाही; ते थोतांड आहे' ही भूमिका घेवून गेली अनेक वर्षे महाराष्ट्र अंनिस लोकांचे प्रबोधन करत आहे. गेल्या अनेक लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या मध्ये महाराष्ट्र अंनिस मार्फत ज्योतिष व्यावसायिकांना आव्हान देण्यात आले होते पण प्रत्यक्षात ते स्वीकारण्या साठी एकही ज्योतिषी पुढे आला नाही असे देखील या पत्रकात नमूद केले आहे. लोकांच्या अज्ञानाचा फायदा उठवून चमत्कार करणाऱ्या आणि फलज्योतिष सांगणाऱ्या बुवाबाबांनी केलेल्या फसवणुकी विरोधात महाराष्ट्र अंनिस गेली अनेक वर्षे सातत्याने कार्यरत आहे. चमत्कार आणि फलज्योतिष यांच्यामधला फोलपणा महाराष्ट्र अंनिसने आपल्या शास्त्रीय मांडणीतून सिद्ध केला आहे. फलज्योतिष व बुवाबाजीच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन समाजाचे आर्थिक, समाजिक, लैंगिक शोषण होऊ नये, यासाठी संघटनेने चमत्कार आणि फलज्योतिषाची वारंवार शास्त्रीय चिकित्सा केली आहे. या चिकित्सेमागे फलज्योतिषातील अवैज्ञानिक बाजू समाजासमोर यावी, असा प्रयत्न राहिलेला आहे.

**********

महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती


प्रेस नोट :

# दूरदर्शनचा भगवा लोगो रंगांना राजकारणात एवढं महत्त्व का?

पक्षीय राजकारण हे एखादं उत्पादन विकण्यासारखंच आहे. सगळे साबण जसे इथून तिथून सारखेच, पण प्रत्येक कंपनी वेगवेगळे दावे करते. कोणी म्हणतं आमचा साबण जंतूंचा ९९ टक्के नायनाट करेल, तर कोणी मृदु-मुलायम-उजळ त्वचेचं आश्वासन देतं. साबणांच्या आवरणांचे रंगही या दाव्यांना साजेसे असतात. राजकीय पक्षांचंही काहीसं तसंच आहे. प्रत्येक पक्ष आम्हीच भारी अशा बढाया मारतो. आपापल्या रंगाचे झेंडे, गमछे, टोप्या अशा प्रचारसाहित्याच्या आकर्षक पॅकेजिंगने मतदाररांवर छाप पाडण्याचा प्रयत्न करतो. ग्राहक जाणून असतो की कोणताही साबण वापरला तरीही आपली नैसर्गिक त्वचा काही फारशी बदलणार नाही, म्हणून त्यातल्या त्यात कमी नुकसान करेल असा साबण तो खरेदी करतो. मतदारालाही पक्कं ठाऊक असतं, की कोणताही पक्ष सत्तेत आला तरी जगावेगळं काही करून दाखवणार नाही, पण दगडापेक्षा विट मऊ म्हणत तो त्यातल्या त्यात बरा वाटणाऱ्याला मत देतो. शेवटी साबणाची कंपनी असो वा राजकीय पक्ष दोघांचाही उद्देश एकच असतो. स्वतःचा नफा! आणि ग्राहक असोत वा मतदार, दोघेही हे जाणून असतात. त्यामुळे खरंतर दूरदर्शनचा लोगो भगवा होणं यात फार काही नवल नाही. मुद्दा आहे तो साधलेल्या मुहूर्ताचा. ऐन निवडणुकीच्या काळात, आचारसंहिता लागू असताना, पहिल्या टप्प्याचं मतदान झालं असताना अचानक रंग बदलण्याची एवढी निकड का वाटली असावी? दूरदर्शनने स्पष्टीकरण दिलं की डीडी न्यूजचा पूर्ण चेहरा-मोहरा बदलण्यात येत आहे आणि लोगोमधला बदल हा त्याचाच भाग आहे, तो भगवा नसून केशरी आहे वगैरे वगैरे पण विरोधकांच्या मते ही सारी सारवासारव आहे.या रंगबदलावरच्या टीकेत सर्वांत आघाडीवर आहे तृणमूल काँग्रेस- निवडणूक काळात सत्ताधारी पक्षाची ओळख असलेल्या भगव्या रंगात डीडी न्यूजचा लोगो सादर करण्यात आला आहे. निवडणूक आयोग हे कसे काय चालवून घेतो? हे आचारसंहितेचं उल्लंघन आहे. हा लोगो त्वरित रोखण्यात यावा, अशी मागणी ममता बॅनर्जी यांनी केली. त्यांच्याच पक्षाचे राज्यसभा खासदार आणि प्रसारभारतीचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी जवाहर सरकार यांनी आता प्रसारभारती प्रचारभारती झाली आहे, अशा शब्दांत या बदलाची संभावना केली. भाजप सत्तेत आल्यापासून भगवे राजकारण हा चर्चेचा मुद्दा झाला आहे. दूरदर्शनवर नेहमीच सरकारी वाहिनी म्हणून टीका होत आली आहे. भाजपच्या कार्यकाळात राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचं थेट प्रक्षेपण करण्यावरून आणि केरळ स्टोरी या चित्रपटाच्या प्रसारणावरून दूरदर्शनचं भगवेकरण होत असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. भारतीय क्रिकेट संघाच्या भगव्या जर्सीवरही कडाडून टीका झाली होती.रंगांच्या राजकारणाचे अनेक किस्से आहेत आणि हे राजकारण सर्वाधिक ठळकपणे रंगतं, ते उत्तर प्रदेशात २९ ऑक्टोबर २०२० ला समाजवादी पार्टीच्या ऑफिशियल ट्विटर हँडलवरून एक ट्विट करण्यात आलं होतं. त्यात हिरव्या आणि लाल रंगांत रंगविलेल्या स्वच्छतागृहांचं चित्र होतं आणि म्हटलं होतं, दूषित विचारांच्या सत्ताधाऱ्यांनी गोरखपूर रेल्वे रुग्णालयातल्या शौचालयाच्या भिंतींना समाजवादी पार्टीच्या झेंड्यातील रंग दिले आहेत. ही लोकशाहीला कलंकित करणारी लाजिवरवाणी घटना आहे. एका मुख्य राजकीय पक्षाच्या झेंड्याचा हा घोर अपमान निंदनीय आहे. भिंतींचे रंग त्वरित बदलण्यात यावेत ही केवळ एक झलक! उत्तरप्रदेशातलं रंगांचं राजकारण गडद होऊ लागलं ते मायावतींच्या काळात. दलितांच्या चळवळीचं प्रतीक असलेला निळा रंग आणि हत्तीचं चित्र ही बहुजन समाज पार्टीची ओळख! या पक्षाच्या मिरवणुका आणि सभांमध्ये निळे झेंडे, गडद निळ्या रंगांचं व्यासपीठ याव्यतिरिक्त एक लक्षवेधक घटक असे तो म्हणजे निळ्या रंगात चेहऱ्यासह संपूर्ण शरीर रंगविलेले कार्यकर्ते. काहीवेळा या कार्यकर्त्यांच्या हातात निळ्या हत्तीच्या प्रतिमा किंवा प्रतिकृतीही असत. मायावती मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर लगेचच राज्यभरात अनेक ठिकाणी रस्त्यांच्या दुभाजकांपासून, सरकारी संपर्क क्रमांकांच्या डायऱ्यांपर्यंत सारं काही निळ्या रंगात रंगून गेलं.

# त्यांनी करायचं ते केलं, आता आपण मतदानातून करायला हवं ते करू या

अठराव्या लोकसभेची निवड करण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या मतदानाच्या वेळापत्रकानुसार पहिला टप्पा पार पडला. देशभरात आता २६ तारखेच्या पुढच्या आणि त्यापुढच्या पाच टप्प्यांसाठी प्रचाराची धामधूम सुरू होईल. निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर होण्याच्या आधीच बऱ्याच वाहिन्या, खासगी संस्थांनी आपली कलचाचण्यांची पहिली फेरी पूर्ण केली असल्यामुळे आता थेट मतदानानंतर चाचण्या होतील. 'एक्सिट पोल'मधून अंदाज घेता येईल. त्यांचाही निष्कर्ष एक जूनला सायंकाळी पाच वाजता मतदानाची शेवटची फेरी पूर्ण झाली की मगच सांगता येईल. चार जूनला तर प्रत्यक्ष मतमोजणीच आहे. सगळ्या पाहण्यांची सरासरी काढली तर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाला सलग तिसरी खेप मिळणार, असे दिसते आहे. जे लक्षावधी मतदार 'तळ्यात मळ्यात' करीत असतात त्यांच्या मानसिक निर्णयावर अशा चाचण्यांचा परिणाम होतो. आस्थिर मतदार संभाव्य विजेत्यांच्या बाजूने झुकण्याचीही शक्यता असते. 'आपण विजेत्या संघालाच पाठींबा दिला होता' ही यातली एक सुप्त, समाधानाची किनार असते; मात्र म्हणून कोणीही मनात विजयाची खात्री बाळगू नये. कितीही अशिक्षित, असंघटीत, जाती-पातीमध्ये विभागलेला असला तरीही भारतीय मतदार अतिशय सुबुद्ध आहे. त्याने आजवर भल्याभल्यांना चारीमुंड्या चीत करुन, प्रकाशझोतातून उचलून पराभवाच्या अंधाऱ्या कोपऱ्यामधे फेकून दिले आहे.भारतीय मतदार हा असा शक्तिशाली असला तरी 'उद्याचा भारत' त्याला नेमका कसा हवा आहे आणि त्याचे दैनंदिन जीवन, समाधानी होण्यासाठी त्याला नेमके काय हवे आहे, याचे थेट प्रतिबिंब पक्षांच्या जाहीरनाम्यात फारच क्वचित पडते. बलाढ्य पक्षांचे उमेदवारही आपल्या पक्षश्रेष्ठींचा जितका विचार करतात, तितका मतदारांचा करत नाहीत. यासाठी कुठल्याही पक्षाशी थेट संबंध नसणाऱ्या नागरिकांचे गट व संघटनांनी दोन पातळीवर जाहीरनामे तयार करायला हवे होते. एक प्रत्येक मतदारसंघाचा आणि दुसरा एकूण राष्ट्रीय कार्यक्रमांचा. पाच वर्षातून एकदाच होणारी मतदानाची कृती ही लोकशाही निकोप चालवण्यासाठी आणि ती अधिक अर्थसधन, भरीव होण्यासाठी पुरेशी नाही; हेच आपल्याला सात दशकात समजलेले नाही. तसे गंभीर प्रयत्नही ही सातत्याने झालेले नाहीत. 'एका साध्या सत्यासाठी देता यावे पंचप्राण' असे म्हणताना कवीच्या मनात जी आटोकाट पराकोटीची सत्यनिष्ठा व तळमळ आहे; तशी तळमळ व निष्ठा 'एका साध्या मतासाठी देता यावे पंचप्राण' असे म्हणू शकणाऱ्या मतदारांच्या मनात तेवायला हवी. ती तितकीच पवित्र आणि गंभीर कृती आहे. लोकसभा निवडणुकांच्या रणधुमाळीला गती येत आहे. या



निवडणुकीसाठी देशभरातून तब्बल ९६.८० कोटी मतदार मतदानास पात्र असतील. पहिल्या निवडणूकीपासून झालेल्या मतदानाचा विचार करता, मतटक्क्यांचा आलेख चढता असला, तरी महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगाल या राज्यांसह देशातील १९ राज्यातील मतदानाचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. हे प्रमाण वाढविण्याबरोबरच एकूण देशातील मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहन देण्याकरिता निवडणूक आयोगाने कंबर कसल्याचे दिसते. मतदारांत जागरूकता निर्मान करण्यापासून मतदानकेंद्रापर्यंत सार्वजनिक वाहतूक सुविधा आणि स्वच्छतेची व्यवस्था करण्यापर्यंत अनेक उपाययोजना करण्याचे आयोगाने जाहीर केले आहे. त्याचबरोबर मतदार जागृतीसाठी स्वीप योजना (पद्धतशीर मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभाग ) राबवली जात आहे.सर्व बस, रेल्वे, मेट्रो स्टॉपवर आणि पोस्ट ऑफिसवर डिजिटल स्क्रिन बसवून मतदार जागरूकता संदेश प्रदर्शित करून रस्त्यावरील जागृकता मोहीम राबवली जात आहे.महिला, प्रथम मतदार, ट्रान्सजेंडर मतदार, सेवेतील मतदार, ज्येष्ठ नागरिक, गृहिणी आदी मतदारांच्या विविध श्रेणींवर लक्ष केंद्रित करणाऱ्या जाहिराती आणि रेडिओ जिंगल्सचे एफएम रेडिओ चॅनल्सवर प्रसारण सध्या सुरू आहे.अकाशवाणीवर फोन-इन कार्यक्रम सादर करून निवडणूक प्रक्रियेविषयी माहिती दिली जात आहे.मतदारांच्या जागरुकता आणि शिक्षणासाठी मोठ्या संखेने सरकारच्या वेबसाईट्चा वापर केला जात आहे.आघाडीच्या वृत्तपत्रांमध्ये सार्वजनिक सूचनांचे प्रकाशन, मतदान प्रकियेच्या तारखा, अंतिम मतदारयादीचे प्रकाशन आणि लोकसभा व विधानसभांच्या निवडणुका यांसारख्या प्रसंगी वर्तमानपत्रांमध्ये रंगीत जाहिरातींचे प्रकाशन केले जात आहे.मतदान यंत्राविषयीचे गैरसमज दूर करण्यासाठीही मोहिमा राबवल्या जात आहेत. माझ्या एका मताने काय फरक पडतो, असा नकारात्मक विचार न करता प्रत्येक पात्र मतदाराने मतदान करायलाच हवे. महाराष्ट्रातील मतदान राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी असणे हे या राज्याला पुरोगामी प्रतिमेला शोभणारे नाही. सामाजिक, राजकीयदृष्ट्या जागरूक महाराष्ट्रातील मतटक्का कमी का राहतो, याचा विचार प्रत्येकाने करायला हवा. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या पुण्यात राष्ट्रीय राजकारणाला गती देणारे नेते होते, त्याच पुण्यातील मतदान ५० टक्क्यांहून कमी असणे ही चिंताजनक बाच आहे. विशेष म्हणजे राज्यात सर्वाधिक मतदार (८२ लाखांहून अधिक) पुण्यातच आहेत. पुण्याखेरीज कल्याण आणि ठाणे या मतदार संघातील मतदानही गेल्या वेळी ५० टक्क्यांच्या खाली होते. मुंबईतील दाक्षिण, उत्तर मध्य, वायव्य तसेच भिवंडी येथील मतदान ५० टक्क्यांहून किंचितच अधिक आहे. मुंबई-पुणे या महानगरातील मतदानाचे कमी असलेले प्रमाण, शहरी मतदारांचा अनुत्साह अधोरेखित करणारे आहे. शहरी भागातील लोकसभा, विधानसभा वा महानगरपालिका मतदानात जास्तीत जास्त ५५ ते ६० टक्के प्रमाण असते तर ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीच्या मतदानाचे प्रमाण तुलनेत चांगले असते. एरव्ही विविध विषयांवर सडेतोड भूमिका मांडणारे शहरी नागरिक मतदानाच्या बाबतीत मागे का हा खरा प्रश्न आहे. त्यांच्यात मतदानाबद्दलचा उत्साह वाढविण्यासाठी निवडणूक आयोगाबरोबरच विविध सामाजिक संघटनांनीही पुढाकार घ्यायला हवा.लोकशाहीत हक्क आणि कर्तव्य यांचा उल्लेख सातत्याने होतो. मतदान हा हक्क आहे; अन् कर्तव्यही! आपल्या आवडीचे सरकार निवडून देण्याची संधी याद्वारे मिळत असते. अनेकदा चित्र मात्र उलटच दिसते. ज्यांच्यासाठी हा खटाटोप होतो, ते मात्र मतदानाच्या दिवशी मिळणाऱ्या सुटीचा आनंद घेण्यासाठी मतदान न करताच कुठे तरी निघून जातात. राजकारणाकडे तुच्छतेने बघत त्याच्यावर भाषणे करणारे कितीजण मतदान करतात, याचाही हिशेब कधीतरी करायला हवा. आपले नाव मतदार यादीत आहे किंवा नाही हे तपासण्याची साधी तसदीही न घेणारे अनेक महाभाग आहेत. बाकी सर्व कामांसाठी मोबाईल वापरणाऱ्यांना यासाठी आपल्या हातातील मोबाइल वापरण्या (चित्रपट, रिल्स व्हाट्स प, फेसबुक आदि) साठी वेळ आहे. पण आपल्या हातातील मोबाईल वापरून समाजमाध्यमांत मतदानजागृतीबाबत पोस्ट करायला फुरसत नसते हे आश्चर्यच आहे. एकूणच आपल्याला जडलेल्या दांभिकपणाच्या रोगाचे प्रतिबिंब निवडणूक नावाच्या प्रयोगात आणि पर्यायाने लोकशाही नावाचा व्यवस्थेत उतरतांना दिसते.

# उमेदवारांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे – निवडणूक सामान्य निरीक्षक निरंजन कुमार

## भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांबाबत मार्गदर्शन दैनंदिन खर्चाची अचूक नोंद ठेवणे बंधनकारक

### प्रत्येक निवडणूक खर्चाची नोंद बंधनकारक : निवडणूक खर्च निरीक्षक

प्रचारासाठी होणाऱ्या प्रत्येक खर्चाची नोंद उमेदवाराने आपल्या निवडणूक खर्च नोंदवहीत करणे बंधनकारक आहे. या नोंदी घेताना त्या विहित नमुन्यात आणि विहित पद्धतीने घ्याव्यात. निवडणूक खर्चासाठी सर्व उमेदवारांचे स्वतंत्र बँक खाते आवश्यक आहे. तसेच एखाद्या उमेदवाराच्या प्रचारासाठी स्टार प्रचारकाची सभा आयोजित केल्यास त्या अनुषंगाने प्रशासकीय पातळीवरून करण्यात येणाऱ्या सुरक्षा विषयक, तसेच इतर बाबींवरील खर्चाचा समावेशही संबंधित उमेदवाराच्या खर्चात केला जाणार आहे, असे संजीब बॅनर्जी यांनी सांगितले. तसेच ज्या उमेदवारांवर गुन्हे दाखल असल्यास त्यांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रित माध्यमातून तीन वेळा त्याची प्रसिद्धी करावी, असे त्यांनी

### भयमुक्त, पारदर्शक निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज : जिल्हाधिकारी

लातूर लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये जिल्हा निवडणूक यंत्रणेने सर्व आवश्यक सज्जता केली असून भयमुक्त, निःपक्षपाती आणि पारदर्शक वातावरणात निवडणूक पार पाडण्यासाठी यंत्रणा सज्ज आहे. तसेच आदर्श आचारसंहितेचा भंग होवू नये, यासाठी विविध पथके तैनात करण्यात आली आहेत. तसेच याप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यामुळे सर्व उमेदवारांनी आदर्श आचारसंहिता आणि प्रचाराच्या अनुषंगाने विविध नियमांचे पालन करून निवडणूक यंत्रणेला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले. तसेच मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

### समाज माध्यमांवर निगराणीसाठी स्वतंत्र कक्ष : जिल्हा पोलीस अधीक्षक

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून जिल्ह्यात समाज माध्यमांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. यासाठी सायबर पोलीस स्टेशन अंतर्गत स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला असून आदर्श आचारसंहितेचा भंग करणाऱ्या, व्यक्तिगत बदनामी करणाऱ्या, सामाजिक तेथ निर्माण करणाऱ्या, भडकवू मजकूर असलेल्या पोस्ट टाकणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे. आतापर्यंत दहा जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अशा प्रकरणात सखोल तपास करून इतरही संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही केली जाणार असल्याचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सांगितले.




लातूर :- लोकसभा सार्वत्रिक निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांचे आणि आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करून निवडणूक पारदर्शक, शांततामय आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी सहकार्य करावे. प्रत्येक बाबीसाठी विहित कालावधीत पूर्वपरवानगी घेवूनच प्रचार मोहीम राबवावी, असे निवडणूक सामान्य निरीक्षक निरंजन कुमार यांनी सांगितले. तसेच उमेदवारांकडून होणारा प्रत्येक खर्च नोंदवहीत नमूद करावा, असे निवडणूक खर्च निरीक्षक संजीब बॅनर्जी यांनी सांगितले. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांबाबत माहिती देण्यासाठी लोकसभा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, निवडणूक संनियंत्रण समितीचे नोडल अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी आप्पासाहेब चाटे, आदर्श आचारसंहिता कक्षाचे सहायक नोडल अधिकारी जावेद शेख यावेळी उपस्थित होते. प्रचारामध्ये कोणत्याही उमेदवाराने भडकावू, तेढ निर्माण करणारी भाषणे करू नयेत. तसेच व्यक्तिगत टीका टाळावी. प्रचारासाठी वाहने आणि इतर बाबींची पूर्वपरवानगी घ्यावी. प्रचाराचा कालावधी, ध्वनिक्षेपक वापराची वेळ सर्वांनी पाळावी. सर्व उमेदवारांनी मतदान प्रतिनिधी आणि मतमोजणी प्रतिनिधी यांची नियुक्ती करून त्यांना आवश्यक प्रशिक्षण द्यावे. मतदानादिवशी मतदान सुरु होण्यापूर्वी ९० मिनिटे अगोदर मॉक पोल घेण्यात येणार आहे. यावेळी सर्व उमेदवारांनी आपले प्रतिनिधी उपस्थित ठेवावेत. तसेच मतदान यंत्रांचे दुसरे सरमिसळीकरण झाल्यावर मतदान केंद्रनिहाय मतदान यंत्रांची यादी सर्व उमेदवारांना देण्यात येणार असून त्याप्रमाणे मतदान यंत्राची मतदान केंद्रावर पडताळणी करावी. गृह मतदानात गोपनीयतेचा भंग होणार नाही, याची दक्षता घेतली जाणार असून उमेवरांनीही यामध्ये सहकार्य करावे, असे निवडणूक सामान्य निरीक्षक निरंजन कुमार म्हणाले.

# जनतेला आता परिवर्तन हवेय

लातूर : महागाई, बेरोजगारीमुळे सध्याचा काळ अनेक अडचणींचा, समस्यांचा बनला आहे. सर्वसामान्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडण्यासाठी आणि देशाचा विकास साधण्यासाठी जनतेला आता परिवर्तन हवे आहे, असे प्रतिपादन 'लातूर ग्रामीण'चे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी मंगळवारी (ता. २३) येथे केले. काँग्रेस व महाविकास आघाडीच्या पाठीमागे सर्वांनी खंबीरपणे उभे राहून या निवडणुकीत डॉ. शिवाजी काळगे यांना बहुमताने विजयी करावे, असे आवाहनही त्यांनी केले.



लातूर लोकसभेचे काँग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ लातूर ग्रामीण मतदारसंघामधील औसा तालुक्यातील वानवडा येथे श्री. शिवशंकर काळे, टाका येथे श्री. ज्ञानेश्वर शिंदे, बिरवली येथे श्री. गुणवंत कदम आणि श्री. सुरेश चव्हाण, जायफळ येथे श्री. प्रकाश भोंग आणि वडजी येथे श्री. शाहू मुळे यांच्या निवासस्थानी बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी ते बोलत होते. आमदार धिरज देशमुख म्हणाले, विधानसभा निवडणुकीत आपण सर्वांनी मला आपला आमदार म्हणून निवडले. त्याच पद्धतीने आता डॉ. शिवाजी काळगे यांच्या रुपाने आपला खासदार आपण सर्वांनी निवडावे. त्यावेळी आपण सर्व पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी काँग्रेसच्या विचारासाठी, लोकांच्या विकासासाठी काम केले. तसेच काम या लोकसभा निवडणुकीत आपण करावे. सरपंच ते खासदार हे लोकप्रतिनिधी एका विचारांचे असतील तर आपला, आपल्या भागाचा विकास अधिक गतीमान होवू शकतो. लातूरमध्ये मराठवाडा रेल्वे बोगी कारखाना आला. मात्र, तो अद्याप सुरू झाला नाही. आपण ७ वर्षे बंद असलेला संत शिरोमणी मारोती महाराज साखर कारखाना सुरू केला. शेतकऱ्यांच्या मुलांना हार्वेस्टर दिले. या माध्यमातून लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार आपण निर्माण केला. केवळ विकासाची जाहिरात करणारे केंद्र सरकार प्रत्यक्ष विकास करू शकले नाही, रोजगार देवू शकले नाही. याबद्दल आपण त्यांना जाब विचारला पाहिजे, असे आमदार धिरज देशमुख यांनी सांगितले. यावेळी श्रीपतराव काकडे, शाम भोसले, अनुप शेळके, धनंजय देशमुख, सतीश शिंदे, महेंद्र भादेकर, सचिन दाताळ, सचिन पाटील, नारायण लोखंडे, सदाशिव कदम, प्रवीण पाटील, संदीपान शेळके, विलास पाटील, रवी पाटील, अजित काळदाते, निर्गुण साळुंके, प्रकाश भोंग, परशूराम मिरकले, शहाजी पाटील, नागनाथ काळे, भरत पाटील, दगडू मुळे, ज्ञानेश्वर काळे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## फक्त आवाज द्या तुम्ही जिथे कमी तिथे आम्ही,



पंचशील सामाजिक संस्था सेक्टर – ६ नेरूळ नवी मुंबई येथे प.पु.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्या प्रसंगी सामाजिक, धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे धम्मदुत : कल्याणकर फक्त आवाज द्या तुम्ही जिथे कमी तिथे आम्ही ची चोख अंमलबजावणी व हिरीरीने भाग घेणारे सबका कल्याणकर... तथागत भगवंत गौतम बुद्ध, फुले, शाहु, आंबेडकर या विचारांनी झपाटलेले उत्तुंग व्यक्तीमत्व नेरूळ नवी मुंबई बौद्धाचार्य कल्याणराव एच. हनवते हे उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवित असतात म्हणून महीला मंडळाच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार : शाल – पुष्पगुच्छ व धम्मदान देऊन केला. त्या वेळचे हे छायाचित्र.

# सारसोळे गाव येथे बौद्धीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी





नवी मुंबई / के. एच. हनवते :- पंचशिल सामाजिक संस्था सेक्टर ६ सारसोळेगांव नेरूळ नवी मुंबई येथे महामानव प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती जल्लोशात साजरी करण्यात आली सर्व प्रथम आपले आदर्श तथागत भगवंत गौतम बुद्ध आणि बोधिसत्व महामानव प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व आगर बत्ती दीपप्रज्वलन करून बौद्धाचार्य कल्याणराव हनवते यांनी विधीवत बुद्ध वंदना घेऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर सुरवातीलाच समाजसेवक : विजय साळे, यांनी आपल्या देशाचा महान राष्ट्रग्रंथ भारतीय संविधान जयंती मंडळ यांना सप्रेम भेट देऊन उपस्थितांना जयंती दिनाच्या मंगलमय हार्दिक शुभेच्छा दिल्या त्यानंतर राष्ट्रीय एकतादल अध्यक्ष : बाबा न्यायनीत यांनी अभ्यासपूर्ण धडाकेबाज भाषण करून उपस्थितांची मने जिंकली, कार्यक्रम स्थळी आरपीआय नवी मुंबई जिल्हाध्यक्ष महेश खरे यांनी पण उपस्थित राहून सर्वांना जयंती दिनाच्या मंगलमय हार्दिक शुभेच्छा दिल्या., यावेळी समाजसेवक दिलीप आमले, गणपत शेलार महादेव पवार, अजित खताळ सर, नवी मुंबई शिवसेना वरिष्ठ नेते : विठ्ठल मोरे (दादा), समाज सेवक प्रल्हाद पाटील, केलास महात्रे, परशुराम मेहर, स्थानिक माजी नगरसेवक : सुरज पाटील, सुजाता ताई पाटील, जयश्रीताई ठाकूर, समाजसेवीका मनिषा लगाडे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते, पंचशील सामाजिक संस्था महिला मंडळ : वानाबाई निकम, उषाताई साठे, अशाताई खंदारे, पद्मिनीताई रणदिवे, मंगल खरात, प्रभावती हिंगोले, रत्ना निकम, पंचशील सामाजिक संस्था सल्लागार : भिमराव तायडे, कोंडीबा हिंगोले, प्रकाश रणदिवे, शिवाजी खडसे, रवींद्र डोंगरे इत्यादी लहान थोरांनी कार्यक्रम स्थळी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली व सायंकाळी महामानव प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यदिव्य तैलचित्राची मिरवणूक काढून आनंद व्यक्त केला.

# लोकसभा निवडणूक म्हणजे न्यायासाठी सुरू असलेली लढाई आमदार धिरज देशमुख यांचे प्रतिपादन; नांदेडमधील लोहा तालुक्यात झालेल्या जाहीर सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी पुढे या**

नांदेड लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस, महाविकास आघाडीचे उमेदवार वसंत बळवंतराव चव्हाण यांच्या प्रचारार्थ नांदेड येथील पावडेवाडी येथे जाहीर सभा झाली. या सभेला उपस्थित राहून आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी मतदारांशी संवाद साधला. लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे या निवडणुकीत हाताचा पंजा या चिन्हासमोरील बटण दाबून काँग्रेस पक्षाला विजयी करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले




लातूर : लोकसभा निवडणूक म्हणजे सत्यासाठी, न्यायासाठी सुरू असलेली लढाई आहे. अन्यायातून, महागाईतून, बेरोजगारीतून सर्वसामान्यांची सुटका करण्यासाठी सुरू असलेला हा संघर्ष आहे. या लढाईतील, संघर्षातील योद्धे बनून आपण काँग्रेस व महाविकास आघाडीला भरभरून आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी सोमवारी (ता. २२) केले. नांदेड लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस, महाविकास आघाडीचे उमेदवार श्री. वसंत बळवंतराव चव्हाण आणि लातूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ लोहा तालुक्यातील सोनखेड (जि. नांदेड) येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी खासदार सुभाष वानखेडे, माजी आमदार रोहिदास चव्हाण, माजी आमदार ईश्वरराव भोसीकर, शिवा संघटनेचे प्रमुख मनोहर धोंडे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. आमदार धिरज देशमुख म्हणाले, महामानवांनी स्वराज्य दिले, संविधान दिले. यानुसार स्वराज्यात रयतेचे राज्य, समानतेचे राज्य निर्माण झाले. पण, अलिकडे उलट घडते आहे. लोकशाही प्रक्रिया खंडीत केली जात आहे. लोकांना विश्वासात न घेता जाचक निर्णय घेतले जात आहेत. त्यामुळे जनतेला महागाई, बेरोजगारी, महिला असुरक्षितता, धार्मिक द्वेष... अशा वेगवेगळ्या प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. याचा काळजीपूर्वक विचार करून नांदेड आणि लातूरमध्ये आपण सर्वांनी काँग्रेसच्या मागे बळ उभे करावे.

# चित्रकूट हनुमान मंदिरात हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी

लातूर :-- येथील चित्रकूट हनुमान मंदिरात हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली प्रति वर्षा प्रमाणे लातूर पूर्व भागातील गरुड चौकातिल चित्रकूट हनुमान मंदिरात हनुमान जयंती निमित्त रात्री १२ वाजता फटाके फोडून आरती करण्यात आली तर सकाळी ५ वाजता नंदकिशोर गंगणे यांच्या हस्ते अभिषक करून भजन करीत गुलाल उधळीत साईनाथ महिला भजनी मंडळ महिलांनी पाळणे महणत हनुमान जय घोष करीत आरती करीत हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली नंतर दिवसभर महाप्रसाद वाटप करण्यात आले या प्रसंगी स्थानिक नगरसेवक मंगेश बिराजदार , स्वामी विवेकानंद पोलीस ठाण्याचे निरीक्षक मुडे,बिट अंमलदार पांडुरंग कोकणे,पोलीस केंद्रे लातूर शहर पूर्व भाग कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे यांच्या सह नागरिकांनी उपस्थित राहून दर्शन घेतले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्य संयोजक नंदकिशोर गंगणे,सदाशिव चाफेकर,शिवाजी अंबेकर,बाबुराव धनगर,शिधु कांबळे,गणेश घोडके,विनोद गंगणे,धीरज कश्यप, गजानन कांबळे,बालाजी सौदागर,अर्णव गंगणे,विजयकुमार अडणे,दिगंबर कसबे,मयूर नागरगोजे ,महेश कांबळे अक्षय बेशककर,दयानंद रोगे,इत्यादींने परिश्रम घेतले



## विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त, समता सैनिक दलाच्या वतीने बोरगाव येथे संचलन,परेड, व मानवंदना, देऊन गावात रॅली काढून जयंती मोठ्या उत्सवात साजरी.




लातूर :- १४ एप्रिल २०२४ रोजी महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त बोरगाव (बु )ता. जि.लातूर येथे समता सैनिक दलाच्या वतीने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची गावात मिरवणूक काढून समता सैनिक दलाने मोठ्या शिस्तीने महामानवास मानवंदना देऊन व परेड करून सर्व भीमसैनिकांना शपथ देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन समता सैनिक दलाचे लातूर जिल्हाध्यक्ष भारत सोनवणे, बालाजी आदमाने गोविंद आदमाने आशिष आदमाने आकाश मोरे प्रशांत आदमाने व इतर समता सैनिक या सर्वांनी पुढाकार घेऊन कार्यक्रम यशस्वी पार पाडला. व या सर्व कार्यक्रमांना मार्गदर्शन आयु देठे साहेब, व प्रशिक्षक खोब्रागडे साहेब,यांनी केले या शिस्तबद्ध कार्यक्रमामुळे समता सैनिक दलाचे गावात गावकऱ्यांनी व नॅशनल दलित मोमेंट फॉर जस्टीस,या सामाजिक संघटनेच्या वतीने कौतुक करण्यात आले

## उस्मानाबाद ( धाराशिव ) लोकसभा मतदार संघात यंदा तिरंगी लढत. उस्मानाबादेत स्वराज्य शक्ती सेनेचे अधिकृत उमेदवार नौशाद इकबाल शेख बाजी मारणार!!

उस्मानाबाद (धाराशिव) /प्रतिनिधी :- उस्मानाबाद ( धाराशिव ) लोकसभा मतदार संघातून २०१९ मध्ये ठाकरे गटाच्या शिवसेनेचे ओमराजे निंबाळकर यांनी राष्ट्रवादीचे राणा जगजितसिंह पाटील यांना हरवून सव्वा लाख मतांनी विजय मिळवला असताना उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात ओमराजे निंबाळकर यांचे वर्चस्व असल्याने तसेच या मतदारसंघात यंदा तिरंगी लढत होण्याची चिन्हं निर्माण झाली आहेत.. स्वराज्य शक्ती सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा सौ. करुणा धनंजय मुंडे यांनी नौशाद इकबाल शेख यांच्या समाज सेवेतील केलेल्या कार्याची दखल घेऊन व उस्मानाबाद (धाराशिव) येथील जनतेशी असलेल्या उत्कृष्ट जनसंपर्क, पत्रकारिता क्षेत्रामध्ये त्यांचे उच्च शिक्षण झाले असून पत्रकारितेतील त्यांचे प्रदीर्घ अनुभव, सामाजिक चळवळीतील लढा, वारंवार समाजातील ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडण्याचे व न्याय मिळवून देण्यासाठी केलेले सतत प्रयत्न ही त्यांची जमेची बाजू पाहून स्वराज्य शक्ती सेना पक्षाच्या वतीने नौशाद शेख यांची धाराशिव लोकसभेसाठी उमेदवार जाहीर करण्यात आली असून नौशाद इकबाल शेख हे मूळचे उस्मानाबाद येथील उमरगा तालुक्यातील केसरजवळगा या गावाचे रहिवासी असून त्यांचा उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात खूप मोठा जनसंपर्क आहे. उस्मानाबाद ( धाराशिव ) लोकसभा मतदार संघातून यंदा तिरंगी लढत होत असून या तिरंगी लढतीत एकनाथ शिंदे शिवसेना गट व ठाकरे शिवसेना गट यांच्यात होत असलेले वाद तसेच शरद पवार राष्ट्रवादी गट व अजित पवार राष्ट्रवादी यांच्यात होत असलेले दोन्ही पक्षातील वाद पाहता उस्मानाबाद ( धाराशिव ) लोकसभा मतदार संघातील जनता संभ्रमात असून येथील जनतेचा कौल नवीन स्थापन झालेल्या स्वराज्य शक्ती सेना करुणा मुंडे यांचे लोकसभेचे अधिकृत उमेदवार नौशाद इकबाल शेख यांच्याकडे वाढलेला दिसत असून येथील जनता स्वराज्य शक्ती सेनेला मतदान करणार असल्याचे नागरिकांतून मोठ्या प्रमाणात चर्चा होताना दिसत असल्याने यंदा तिरंगी लढतीतून स्वराज्य शक्ती सेनेचे अधिकृत उमेदवार नौशाद इकबाल शेख हे खूप मोठ्या मतांनी बाजी मारणार असल्याचे चिन्ह पाहताना दिसत आहेत. उस्मानाबाद ( धाराशिव ) शिवसेना समर्थक ओमराजे निंबाळकर यांना शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाकडून लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. राष्ट्रवादीचे नेते आणि भाजपाचे विद्यमान आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील





यांना अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. उस्मानाबाद ( धाराशिव ) लोकसभेचे उमेदवार शिवसेनेचे ओमराजे निंबाळकर व राष्ट्रवादीचे अर्चना पाटील......विरोधात आता स्वराज्य शक्ती सेना घेऊन करुणा धनंजय मुंडे यांनी आपला उमेदवार नौशाद शेख यांना उमेदवारी जाहीर करून उस्मानाबादच्या मैदानात उडी घेऊन मोठ्या मताधिक्यांनी निवडून येणार असल्याचीही तयारी केलीय...त्यामुळं स्वराज्य शक्ती सेना उमेदवार नौशाद शेख दोन्ही पक्षांच्या अंतरवादात तिरंगी लढतीत बाजी मारणार आहे.

## गावाकडे जाण्यास पक्का रस्ता मिळेल का; प्रेमनगरवासीय संतापले वनविभागाच्या हस्तक्षेपामुळे समस्या कायम




किनवट.ता.प्रतिनिधी.(शेख शौकत) :तालुक्यातील आदिवासी व इतर वस्त्यांना वनविभागाच्या हस्तक्षेपामुळे दळणवळणाची समस्या कायम आहे. धामनदरी ग्रामपंचायतीच्या हद्दीत व डोंगर माथ्यावर येणाऱ्या प्रेमनगर वसवाडी या वस्तीला अजूनही पक्का रस्ताच मिळाला नाही. धामनदरी ते प्रेमनगर है केवळ दीड दोन किलोमीटरचे अंतर आहे; पण रस्ते विकासाच्या युगात तरी खडतर रस्त्यांचा वनवास संपेना, असे विदारक चित्र पाहण्यास मिळत आहे.

शालेय विद्यार्थ्यांची रस्त्या नसल्याने गैरसोय

:किनवट तालुका हा जंगल, दऱ्या-खोऱ्यात वसलेला आहे. दवाखाना, शासकीय व खासगी कामांसाठी तालुका मुख्यालयी जायचे झाले तर मोठी समस्या आहे. शालेय विद्यार्थ्यांना ये-जा करण्यासाठी मोठी अडचण आहे. वनविभागाने मानवी वस्त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांना तरी मंजुरी देऊन दळण-वळणाचा प्रश्न सोडवण्याची अपेक्षा नागरिक करीत आहेत. किनवट मुख्यालयाला जायचे झाल्यास पायाने गेल्याशिवाय गत्यंतर नाही. आता कसेबसे दुचाकी व चारचाकी वाहन धामनदरी येथून पहाड असलेल्या जंगलातून प्रेमनगरला जाते; पण कच्चा रस्ता असल्याने हा प्रवास जीवघेणाच आहे. वाहन चढवताना व उत्तरवताना जीव धोक्यात घालून उतरवावे लागत आहे. किनवट ते धामनदरी हे अंतर १९ किलोमीटरचे आहे. तर प्रेमनग वसवाडीचे अंतर १७ ते १८ किलोमीट आहे. या मार्गाने तालुक्याच्य मुख्यालयी जाणे प्रेमनगर वसवाडीवासीयांना सोयीचे आहे.

## किल्लारी येथे ५०० च्या बनावट नोटांचा सुळसुळाट

किल्लारी : वार्ताहर किल्लारी येथील बाजारपेठेत सध्या ५०० रुपयांच्या बनावट नोटा बाजारात आल्यामुळे व व्यापा-यांची फसवनुक होत आसल्यामुळे हाचिंतेचा विषय होत असून याबाबत विभागाने लक्ष देऊन घालुन या टोळीस पकडावे अशी मागणी व्यापा-यांतून केली जात आहे.बाजारपेठेतील बनावट नोटा या व्यापा-यात चर्चेचा विषय झाला आहे. दोन दिवसांपूर्वी या परीसरात वादळी पाऊस झाला त्यामुळे लाईट बंद झाली. याचा फायदा या टोळीने घेतला व येथील एका दुकानात आईसक्रीम, कोल्ड्रीक वगेरे घेऊन त्या बनावट नोट देऊन वापस पैसे ही घेऊन गेले म्हणजे शुन्य कागद देऊन सामानही घेतले व ओरीजनल पैसेही घेऊन गेले..अशा अनेक व्यापा-याची फसवुनक झाली आहे

## लोकसभा निवडणूक २०२४ माध्यम कक्ष,मुंबई उपनगर जिल्हा महाराष्ट्र दिनी मतदार जनजागृतीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातर्फे सायकल रॅली.

मुंबई उपनगर दि. २३ : लोकसभेच्या निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील २६-मुंबई उत्तर, २७- मुंबई उत्तर पश्चिम, २८- मुंबई उत्तर पूर्व, २९- मुंबई उत्तर मध्य या मतदारसंघात २० मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. मतदानाची टक्केवारी वाढावी होण्यासाठी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुढाकाराने महाराष्ट्र दिनी म्हणजेच १ मे २०२४ रोजी सकाळी ६.३० वाजता सायकल रॅली काढण्यात येणार आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी ही माहिती दिली आहे. बाईक्स मुंबई, मुलुंड रायडर्स यांच्या संयुक्त विद्यमाने आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या पुढाकाराने ही सायकल रॅली आयोजित करण्यात आली आहे.मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय, वांद्रे (पूर्व),मुंबई येथून सायकल रॅलीला सुरवात होईल.त्यानंतर ही रॅली वेगवेगळ्या मार्गाने दक्षिण मुंबई,एनसीपीए,अंधेरी क्रीडा संकुल,बोरीवली येथील प्रबोधन ठाकरे नाट्यगृह,मुलुंडचे कालिदास नाट्यमंदिर या चार ठिकाणी रॅलीचा समारोप होईल.

लोकसभेच्या निवडणुका हा लोकशाहीचा राष्ट्रीय महोत्सव आहे. या महोत्सवात अधिकाधिक मतदारांनी मतदान करून आपले कर्तव्य पार पाडावे म्हणून 'स्वीप' उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृतीचे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.त्याचाच एक भाग म्हणून ही सायकल रॅली काढण्यात येईल.या रॅलीत सहभागी होण्यासाठी नागरिकांनी गुगल फॉर्म भरावयाचा आहे. अधिक माहितीसाठी डॉ.विश्वनाथ अय्यर (मोबाईल क्रमांक ९६१९४४४०२७),कमल गाडा (मोबाईल ९८२१०२५३८१) यांच्याशी व्हॉट्सप संदेशाद्वारे संपर्क साधावा,असे आवाहन संयोजकांनी केले आहे. सागर रामभाऊ तायडे यांसकडून

## मोदींची विकास कामे घरोघरी पोहोचवा : प्रदेश कार्यकारणी सदस्य शैलेश लाहोटी



लातूर/प्रतिनिधी : भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ भाजपाचे सरचिटणीस ॲड. दिग्विजय काथवटे यांच्या निवासस्थानी सुपर वॉरियसची बैठक प्रदेश कार्यकारिणी सदस्य शैलेश लाहोटी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. या बैठकीस मंडल अध्यक्ष प्रमोद गुडे, रवी सुडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना लाहोटी म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचे नाव जगभरात उंचावले आहे. त्यांनी देशातील सर्वसामान्य जनतेसह शेतकरी बांधवांसाठी विविध योजना आणल्या आहेत. विकास योजनांच्या माध्यमातून भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांनी लातूर जिल्ह्यासाठी कोट्यवधींचा निधी आणून विविध विकास कामे प्रत्येक गावापर्यंत पोहचवली आहेत. हीच विकास कामे घरोघरी पोहोचवून येणार्या निवडणूकीत मोदींचे हात बळकट करण्यासाठी खा. सुधाकर शृंगारे यांना मतदानरुपी आशीर्वाद द्यावे, असे आवाहन लाहोटी यांनी यावेळी बोलताना केले. प्रत्येक वॉरियर्सने घरोघरी पोहोचून मोदी सरकारच्या काळात झालेली विकास कामे सांगितली पाहिजेत. लातूरच्या विकासाची घोडदौड कायम ठेवण्यासाठी परत एकदा खा. सुधाकर शृंगारे यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्यासाठी सर्वांनी मिळून परिश्रम करण्याचे आवाहन लाहोटी यांनी यावेळी केले. यावेळी बोलताना ॲड. दिग्विजय काथवटे म्हणाले की, देशाला विकासाच्या पथावर कायम अग्रेसर ठेवण्यासाठी मोदींना तिसर्या वेळेस संसदेत पाठविणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्व सुपर वॉरियर्सनी भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना दुसर्यांदा मताधिक्याने निवडून देण्यासाठी परिश्रम घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. या बैठकीस मंडलातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## समाजकारणासाठी राजकीय क्षेत्रात कार्यरत : खा. सुधाकर शृंगारे निटूर व हाडगा (उमरगा) येथे भाजपा महायुतीच्या प्रचारार्थ जाहीर सभा

निलंगा/प्रतिनिधी : लहानपणापासूनच समाजातील गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी यांच्या समस्या पाहत आलो आहे. या वर्गाला अडचणीतून बाहेर काढावे अशी तळमळ मला कायमच वाटत आली आहे. या समाजघटकाच्या विकासासाठी सामाजिक काम करावे, म्हणून मी राजकीय क्षेत्रात पदार्पण केले. त्याला आपणही पाठबळ दिले, अशी भावना खा. सुधाकर शृंगारे यांनी व्यक्त केली. मंगळवारी निटूर येथील बाजार चौकात आयोजित सभेत खा. शृंगारे बोलत होते. या सभेस लोकसभा संयोजक माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, लोकसभा प्रभारी किरण पाटील, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, निलंगा विधानसभा प्रमुख दगडू साळुंके, जिल्हा उपाध्यक्ष शेषेराव ममाळे, तालुकाध्यक्ष कुमोद लोभे, सरपंच प्रतिभाताई पाटील, अशोक शिंदे, रोहीत पाटील, संध्याताई पाटील, मनिषाताई शिंदे, उषाताई उफडे आदींची उपस्थिती होती. खा. शृंगारे म्हणाले की, मागील पाच वर्षात सामान्य नागरिकांच्या हितासाठी केंद्र सरकारच्या विविध योजना मतदारसंघात राबविल्या. लाखो नागरिकांना याचा लाभ मिळाला. मतदारसंघात कोट्यवधी रुपयांची विकासकामे झाली. ही कामे अधिक गतीने व्हावीत यासाठी आपले मतदानरुपी पाठबळ हवे असल्याचेही ते म्हणाले. सभेस मार्गदर्शन करताना आ. निलंगेकर म्हणाले की, आई-वडिलांनी जन्म दिला परंतु निलंगा तालुक्यातील जनतेने मला खर्या अर्थाने राजकीय जन्म दिला. जनतेचे हे प्रेम आपण कधीही विसरू शकत नाही. त्यामुळेच निलंग्यासह जिल्ह्याच्या विकासासाठी काम करीत आलो आहे. मागील काळात जिल्ह्यात महामार्गांचे जाळे तयार झाले. बाभळगावला जाणारा रस्ताही आम्हीच करून दिला. त्यामुळे विकास म्हणजे काय हे विरोधी पक्षाने आम्हाला सांगू नये. आगामी काळात निलंगा येथे एमआयडीसीची स्थापना केली जाणार आहे. ग्रामीण भागात सध्या हरिनाम सप्ताह होत आहेत. ज्या गावांमध्ये सप्ताह आहे तेथे अन्नदानासाठी साखर देण्याचा शब्दही आ. निलंगेकर यांनी यावेळी बोलताना दिला.






खा. शृंगारे यांच्यासह मान्यवरांनी हाडगा उमरगा येथे शहीद जवानांना नमन केले. विठ्ठल - रूक्मिणी मंदीर व हनुमान मंदिरात जावून दर्शनही घेतले. याप्रसंगी अंकुश लोभे, परमेश्वर बिराजदार, अरविंद कांबळे, युवराज सुरवसे, महादेव लोभे, आत्माराम लोभे, अजित लोभे, पंडीत लोभे, वसंत जाधव, संजय स्वामी आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE